देशोन्नती
चंद्रपूर | रविवार | दि. १५ सप्टेंबर २०२४
www.deshonnati.com
epaper.deshonnati.com

# निळकंठराव शिंदे महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

देशोन्नती वृत्तसंकलन

भद्रावती : स्थानिक निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालयात सांस्कृतिक विभागातर्फे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व श्री चक्रधरस्वामी यांची जयंती संयुक्तपणे साजरी करण्यात आली. याप्रसंगी शिक्षक दिनाचे औचित्य साधून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

प्राचार्य डॉ. एल. एस. लडके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या ह्या कार्यक्रमात प्रमुख अतिथी प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. प्रिया शिंदे, विशाल गौरकार व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. अपर्णा धोटे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. प्रिया शिंदे यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व श्री चक्रधरस्वामी यांच्या ज़िवन कार्यावर प्रकाश टाकला. तसेच आपल्या कार्याचे उत्तम नियोजन करून यश संपादित करा. असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. विशाल गौरकार यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. याप्रसंगी अतिथींच्या शुभहस्ते शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये महाविद्यालयातून सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा भद्रावती शिक्षण संस्था भद्रावती, प्राचार्य व प्राध्यापकांकडून बक्षीस व शिष्यवृत्तीचे वाटप करुन सत्कार करण्यात आला. तसेच बी.ए. भाग तीन ची विद्यार्थिनी कुमारी प्रणिता वाबिटकर या विद्यार्थिनीला 'स्टुडन्ट ऑफ द इयर' ह्या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. प्राचार्य डॉ. एल. एस. लडके यांनी अध्यक्षीय मार्गदर्शनात श्री चक्रधर स्वामी यांच्या कार्याची माहिती दिली. तसेच शिक्षक दिना विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. स्वातंत्र्य भारताचे प्रथम उपराष्ट्रपती व दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करतात .या दिवशी प्रत्येक विद्यार्थी यशाचा मार्ग दाखवणाऱ्या व घडविणाऱ्या शिक्षकाचे आभार मानतात .तसेच .आई-वडिलांनंतर शिक्षकच संस्कार घडविण्याचे काम करतात. यावर मार्गदर्शन करीत गुरु व शिष्या बद्दलचे सर्व दाखले देत गुरुचे स्थान शिष्याच्या जीवनात महत्त्वाचे असल्याचे म्हटले. तसेच विद्यार्थ्यांना जीवनात प्रगती करायची असेल तर गुरु विषयी आदर करणे महत्त्वाचे आहे .असे मत व्यक्त केले .तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. सुत्रसंचलन व प्रास्ताविक प्रा. डॉ अपर्णा धोटे आणि आभार प्रदर्शन लेफ्टनंट प्रा. सचिन श्रीरामे यांनी केले. ( ता. प्र. )




Dr. L.S. Ladke
PRINCIPAL
N.S. Science & Arts College
Bhadrawati, Dist-Chandrapur